# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१६ 2694 दि. 29/9/2016

**महत्वाचे व अति-तात्काळ**

**परिपत्रक**

**विषयः-१०० टक्के केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर स्किम ऑफ स्कॉलरशिप फॉर कॉलेजेस ॲण्ड युनिव्हर्सिटी स्टुडंटस सन २०१६-१७...**

संदर्भः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं/१४अई/सीएसएस//२०१६-१७/१०९६३, दि.२३.०९.२०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०१६ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (इयत्ता १२वी मध्ये) कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी व प्रथम नुतनीकरणाचे अर्ज (Fresh & 1st Renewal) ऑनलाईन (Online) पदधतीने व व्दितीय, तृतीय व चतुर्थ नुतनीकरणाचे (2nd, 3rd & 4th Renewal) अर्ज ऑफलाईन (Offline) पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

- **नवीन मंजूरी (Fresh)**

१. नवीन मंजूरी व प्रथम नुतनीकरणासाठी (Fresh & 1st Renewal) विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना www.scholarship.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याचे स्वतःचे आधार कार्ड असणे अनिवार्य असून तो आधार क्रमांक त्याच्या बँक खात्याशी संलग्न (Link) केलेला असावा.

३. नवीन मंजूरी व प्रथम नुतनीकरणाचे अर्ज करण्याची विस्तृत कार्यपध्दती व जाहिरात www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

- **नुतनीकरण (Renewal)**

१. विद्यार्थ्यांना नुतनीकरणासाठी मागील वर्षीच्या परीक्षेत किमान ६०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त होणे आवश्यक आहे.

२. व्दितीय, तृतीय व चतुर्थ नुतनीकरणाचा (2nd, 3rd & 4th Renewal) अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन परिपूर्णरित्या भरुन तो आवश्यक त्या कागदपत्रांसह **महाविद्यालयाकडे दि.२०.१०.२०१६ पर्यंत जमा करावा.**

३. महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचेच अर्ज सोबत जोडलेल्या **विहित नमून्यात (Excel Sheet) मध्ये इंग्रजीत माहिती भरुन दि.३०.१०.२०१६ पर्यंत संबंधित विभागीय सहसंचालक (सदर कार्यालय) यांचेकडे जमा करावेत.**

**सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१६-१७ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्था प्रमुख यांची असेल. आपल्या महाविद्यालयात / संस्थेत शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे आणि सदर शिष्यवृत्तीची जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या / संस्थेच्या दर्शनी भागावर झळकविण्यात यावी. तसेच त्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून घेवून तसेच ते त्यांच्या बँक खात्याशी संलग्न करुन घेण्यासही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.**

सदर शिष्यवृत्ती योजनेची जाहिरात, अर्जाचा नमूना, मार्गदर्शक सूचना व वेळापत्रकासह www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर परिपत्रकाव्दारेही सोबत जोडण्यात येत आहे.

सोबतः वरील प्रमाणे.

RBhosle
29/9/16

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रति,

१. प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये, जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.
२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई,
३. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई

प्रतः मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.